**सकाळी ११.०० पासून ते दुपारी २.४५ पर्यंत साक्षीदार हजर. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा अनेक वेळा पुकारा केला असता, सहाय्यक सरकारी अभियोक्ता गैरहजर असल्यामुळे कलम ३०९ फौ.प्र.सं. प्रमाणे सहाय्यक सरकारी अभियोक्ताच्या अनुपस्थितीत साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात येतो.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**<u>निशाणी १०</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – शुभम विष्णू मटकर

माझे वय – २७ वर्षे,

व्यवसाय – फोटोग्राफी

रा.ने. – रामगड बाजारपेठ, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग

**<u>सरतपास न्यायालयामार्फत.</u>**

०१. दि. २९/११/२०२३ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळी बोलविले होते. घटनास्थळ हे देवूळवाडा ते आचरा जाणाऱ्या रस्त्यावरती आहे. सदर ठिकाणी अपघात झालेला होता. त्या ठिकाणी रक्त पडलेले होते. त्या ठिकाणी दोन टू व्हीलर गाडया होत्या. मला सदर गाडयांचे नंबर सांगता येणार नाहीत. दोन्ही वाहनांचा समोरच्या बाजूने नुकसान झालेले होते. घटनेला बरेच दिवस झाले असल्यामुळे मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. सदरचा पंचनामा माझ्यासमक्ष झालेला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र. पी.१/पी.डब्ल्यू.१</u>** दिली आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.पई यांचे मार्फत.</u>**

०२. मी रामगड ग्रामपंचायतीचा सरपंच आहे. मला पंचनाम्याला जायचे आहे असे

पोलीस कांबळी यांनी सांगितले होते. मला पंचनाम्याला कधी वाजता बोलविले होते हे मला सांगता येणार नाही. मला पंचनामा किती वाजता झाला होता हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दोन्ही वाहनांचे वर्णन व रजिष्ट्रेशन नंबर सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, दोन वाहनांपैकी एक वाहन होंडा शाईन होते. हे म्हणणे खरे आहे की, मला अपघाग्रस्त रस्त्याची संपुर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथित अपघातग्रस्त रस्त्यावरुन कणकवलीवरुन आचऱ्याकडे जाताना डाव्या बाजूला गांगेश्वर मंदिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मंदिराच्या लगत असणाऱ्या रस्त्याच्या आजूबाजूला रहात्या घराची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, कणकवलीकडून आचऱ्याकडे जाताना गांगेश्वर मंदिरासमोर असणारा रस्ता थोडासा चढाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गांगेश्वर मंदिराकडून कणकवली आचरा या मुख्य रस्त्याकडे जाणारा रस्ता तीव्र चढाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गांगेश्वर मंदिराकडून मुख्य रस्त्याकडे दुचाकीने जाण्यासाठी तीव्र वेगाने जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, गांगेश्वर मंदिराकडून जाणाऱ्या रस्त्यावर बरेच अपघात झाल्याने ग्रामस्थांच्या मागणीनुसार सदरचा रस्ता दुरुस्त करुन घेतलेला आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, घटनेच्या पुर्वी त्या ठिकाणी गतीरोधक घातला होता परंतु पीडब्ल्यूडीने सदरचा गतीरोधक घटनेच्या अगोदर काढला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा गतीरोधक असता तर अपघात झाला नसता.

०३. पंचनाम्याच्या वेळेस अपघाताबाबतची माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा काय असतो व त्याचा मसुदा काय असतो याबाबतची मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना पंचनाम्यातील मजकूर सांगितला व पोलीसांनी त्यातील मजकूर लिहून घेतला असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यातील मजकूर लिहिला व त्यावर माझी सही घेतली होती. मी घटनास्थळ पंचनाम्याच्यावेळेस घटनास्थळी दोन्ही वाहन पाहून त्याच्या नुकसानाबाबत खात्री केली होती. कथित घटनास्थळापासून बेळणे चेकपोस्ट साधारणपणे ३ किमी. अंतरावर आहे. मला पंचनाम्याची तारीख सांगता येणार नाही.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्यासाठी बोलविले होते, मी घटनास्थळी गेलो होतो, त्या ठिकाणी दोन मोटरसायकलचे समोरच्या बाजूने नुकसान झाले होते, माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत करण्यासाठी पंचनामा माझ्या समक्ष झालेला नसतानाही पंचनामा माझ्या समक्ष झालेला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण

दिनांक : ०१/०७/२०२४